Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

BMC कर्मचाऱ्यांना 33000 रुपयांच्या बोनसची घोषणा! (पान २ वर)



। गुरुवार, दि. २९ ऑक्टोंबर २०२६। वर्ष १ ।अंक १९८ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

धूळ नियंत्रणात हयगय केल्यास कारवाई!

मुंबई । शहरातील बांधकाम स्थळे तसेच लगतच्या रस्त्यांवरील धूळ नियंत्रणाची जबाबदारी पूर्णपणे संबंधित विकासक आणि बांधकाम व्यावसायिकांची असून, यामध्ये हयगय करणाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याचे आदेश पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिले आहेत. फटाक्यांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे सर्व प्रशासकीय विभागांनी काटेकोर पालन करावे, अशी सूचनाही त्यांनी केली. मुंबईतील वायू प्रदूषण नियंत्रण, उच्च न्यायालयाचे आदेश आणि वायू गुणवत्ता सुधारणेसंदर्भात पालिका मुख्यालयात आढावा बैठक पार पडली. डॉ. अविनाश ढाकणे, उपआयुक्त अविनाश काटे, प्रशांत गायकवाड यांच्यासह सर्व परिमंडळीय सहआयुक्त व साहाय्यक आयुक्त उपस्थित होते. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सार्वजनिक रस्ते, पदपथ, गल्ल्या तसेच शाळा, रुग्णालये, न्यायालये यांसारख्या शांतता क्षेत्रांत फटाके फोडण्यास पूर्ण बंदी आहे.

राहुलनी अहंकार सोडला तरच संघ-भाजपा विरोधातील लढाई जिंकतील

'ज्ञानेशकुमार हटाव'च्या घोषणांनी मुंबई दुमदुमली

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मार्गावर ज्ञानेश कुमार हटाव पदयात्रा

जन सम्राट टाईम्स

मुंबई | मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेतील कथित बेकायदा तरतुदींवर आक्षेप घेत वंचित बहुजन आघाडीने केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेशकुमार यांना पदावरून हटविण्याची मागणी केली आहे. या मागणीसाठी बुधवारी मुंबईत 'ज्ञानेशकुमार हटाव' पदयात्रा काढण्यात आली. मेट्रो सिनेमापासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या दिशेने निघालेल्या या पदयात्रेत हजारो कार्यकर्ते सहभागी झाले.

पदयात्रेनंतर महापालिका मार्गावर झालेल्या सभेत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर टीका केली. देशात पारदर्शक पद्धतीने निवडणुका झाल्या, तरच लोकशाही टिकू शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले. ज्ञानेशकुमार यांच्या विरोधातील आंदोलन राजकीय पक्षांच्या माध्यमातून सुरू असेपर्यंत ते लोकशाहीच्या चौकटीत राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. "जनता आता काठ्यांचा उपयोग झेंड्यासाठी करत आहे; मात्र ज्ञानेशकुमार यांना पदावरून हटवले नाही, तर याच काठ्या सत्ताधाऱ्यांवर पडतील," असा इशारा आंबेडकर यांनी सभेत दिला. त्यांच्या या वक्तव्यामुळे



सभेतील राजकीय वातावरण तापले. मतदारांच्या अधिकारांशी संबंधित प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास जनतेचा असंतोष वाढू शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. एसआयआर प्रक्रियेमुळे सुमारे १३ कोटी नागरिकांचा मतदानाचा हक्क डावलला गेल्याचा दावा करत, हे नागरिक रस्त्यावर उतरल्यास परिस्थिती हाताळणे पोलिसांना कठीण जाईल, असे आंबेडकर म्हणाले. हा आकडा आणि त्यासंबंधीचे आरोप त्यांनी सभेत मांडले; त्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी या वृत्तासाठी उपलब्ध नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपविरोधातील लढाई काँग्रेसला एकट्याने लढता येणार नाही, असे मत व्यक्त करत आंबेडकर यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना विरोधकांशी समन्वय साधण्याचे आवाहन केले. अहंकार बाजूला ठेवून सर्व विरोधी पक्षांना ज्ञानेशकुमार यांच्या विरोधातील लढ्यात सहभागी करून घ्यावे. व्यापक विरोधी एकजूट उभी राहिल्यासच ही लढाई प्रभावीपणे लढता येईल, असे त्यांनी सांगितले. पदयात्रेत शाहू-फुले-आंबेडकरी विचारधारेचे हजारो कार्यकर्ते राष्ट्रध्वज घेऊन सहभागी झाले होते.

अनेकांच्या हातात 'ज्ञानेशकुमार हटाव' अशा घोषणा असलेले फलक होते. घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेची मागणी केली. वंचित बहुजन आघाडीची ही पदयात्रा भायखळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या मार्गावरून काढण्याचे नियोजन होते. मात्र, अडथळा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी त्या मार्गाला परवानगी नाकारली. त्यानंतर मेट्रो सिनेमापासून सायंकाळी चार वाजता पदयात्रेला सुरुवात करण्यात आली. पदयात्रेचा समारोप महापालिका मार्गावरील सभेने झाला.

विविध नेत्यांची उपस्थिती

या आंदोलनात शिक्षक भारतीचे माजी आमदार कपिल पाटील, वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे, युवा नेते सुजात आंबेडकर, भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर, सरचिटणीस प्रियदर्शनी तेलंग आणि प्रवक्ते फारुक अहमद यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले. उपस्थित नेत्यांनीही सभेत आपली भूमिका मांडली. एसआयआर प्रक्रियेतील तरतुदी, मतदारयाद्यांची अचूकता आणि निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास हे मुद्दे या आंदोलनाच्या केंद्रस्थानी होते. निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांवर संबंधित यंत्रणा काय भूमिका घेते, तसेच विरोधी पक्ष या मुद्द्यावर पुढे कोणती भूमिका घेतात, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

गुजरातचे दोघे आमचा सह्याद्री पोखरणार का? उपमुख्यमंत्र्यांना शुन्य किंमत! राज ठाकरेंचा सरकारवर घणाघात

जन सम्राट टाईम्स

पुणे। प्रतिनिधी: बुधवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कर्जतच्या सोय डोंगरावर जाऊन तोंडलेल्या झाडांची पाहणी केली. त्यानंतर संध्याकाळी त्यांनी 'सह्याद्री जागा हो' अशी टॅगलाईन घेऊन एक सभा घेत केंद्रासह राज्यसरकारवर प्रश्नांचा भडीमार केला. आज जंगलतोड झाली तिथे मी गेलो होतो, तोडलेली लाकडं रचून ठेवली होती. ते बघताना मला वाटलं जंगलाच्या अंतिम संस्काराला आलो आहे. इतक्या वर्षांची जुनी झाडं, कोणत्या तरी गुजरात्यासाठी म्हणून कापून टाकत आहेत. मला सांगा या प्रकल्पाची गरज काय आहे? या सगळ्या गोष्टींच्या मागचं षडयंत्र तुम्ही समजून घेतलं पाहिजे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री असतील, यांना केंद्रात जे दोघं बसलेत यांच्याकडून शून्य किंमत आहे, असेही राज ठाकरे कर्जतच्या सभेत म्हणाले.ते पुढे म्हणाले, आम्ही जे सांगू ते महाराष्ट्रात झालं पाहिजे. हा जमिनीचा तुकडा, जंगलाचा तुकडा आम्ही सांगतो, त्याला देऊन टाका. हे सगळं वरती ठरतं. मी विभानसभेच्या वेळी पुन्हा सांगत होतो, महाराष्ट्र जर यांच्या हाती गेला, तर दोन माणसांच्या हाती महाराष्ट्र जाईल आणि ते वाट्टेल ते करतील.सरकारचं असं वागण्यास कारणीभूत निवडणुकीच्या तोंडावर आत्तापर्यंत कुणाला मतदान केलं, कुणाला निवडून दिलं, यात लपलं आहे. 30 ते 35 टक्के जनता आणि बाकी निवडणूक आयोग आहेच. मातचा-भगिनींना 1500 रुपये लाडकी बहिण योजना, अशा योजनेतून तुम्हाला विकत घेतलं जातं आहे आणि तुमची तोंड बंद केली जात असल्याची टीका त्यांनी केली.महाराष्ट्रात सत्तेत बसलेले लोक आहेत. त्यांच्या हातात काहीच नाही. मुख्यमंत्र्यांचं निवेदन मी त्यादिवशी ऐकलं. त्यांनीच



सांगितलं की, केंद्राने ठरवलं आणि खासगी कंपनीने ठरवलं आणि मग हा प्रस्ताव आम्हाला दिले हे त्यांनीच सांगितलं. मी तुम्हाला म्हणालो तसं हे सगळं वरती ठरतं. उद्योगपती मोदी आणि शहा यांना भेटतात आणि सांगतात की, आम्ही जमीन पाहिली आहे. आम्हाला प्रकल्प उभारायचा आहे. मग वरून खाली फोन येतात. मग पोलिसांसारखं वागायचं. सिनीयर आली की सॅल्युट करतात. सत्तेची भीती, पदाची भीती वाटते म्हणून हे पण तसंच वागतात. ते पुढे म्हणाले की, गप्प राहणारा, शांत राहणारा, मान खाली घालून चालणारा महाराष्ट्र का? गुजरातचे दोन माणसं महाराजांचा महाराष्ट्र चालवणार का? आमची सह्याद्री पोखरणार का? आणि आम्ही हतबल झालो आहोत.

आज गावातल्या महिला मला येऊन भेटल्या. हातात लेकरू होतं त्यांच्या, जंगल वाचवा म्हणत होत्या. तुमच्यावर हात जोडायची वेळ येते? मग तुमचे कोयते काय करतात? कोयते काय फक्त फांद्या छाटायला आहे का? असा प्रश्नही त्यांनी ग्रामस्थांना केला. कर्जतमध्ये आलेला प्रकल्प काही टेंडर निघालं नाही. ही महाराष्ट्रातील यादी वाचून दाखवतो, एकूण 23 प्रकल्प येत आहे. त्यातील काही प्रकल्प हे बाहेरचे आहे. यातील 3 प्रकल्प हे फक्त केंद्रातले असल्याचे राज ठाकरे यावेळी म्हणाले. ते पुढे म्हणाले की, अदानी हायड्रो, रिव्ह हायड्रो, मेगा इंजनियअरिंग, अदानीचे 3 प्रकल्प, जेएसडब्यू, अदानी, टोरंट, रिंको हे सगळे खासगी प्रकल्प आहे. असे 23 प्रकल्प आहे, 236 प्रकल्प येत आहे. हे सगळं चालू आहे, महाराष्ट्रामध्ये टेडा सेंटर येणार आहे, त्यासाठी विज लागणार आहे. या प्रकल्पाच्या बाजूला शहरं बसणार आहे, त्यांना विज लागणार असल्याचे ते म्हणाले. तसेच कोळश्यावर चालणारी 40 प्रकल्प येत आहे. माझा प्रश्न असा की, 40 आणि हे 23 प्रकल्प कुणासाठी आणत आहात, नीट जर पाहिलं तर तुमचे मतदारसंघ फोडत असल्याचा आरोप यावेळी राज ठाकरेंनी केला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कर्जतच्या सोय डोंगरावर जाऊन तोंडलेल्या झाडांची पाहणी केली. त्यानंतर संध्याकाळी त्यांनी 'सह्याद्री जागा हो' अशी टॅगलाईन घेऊन एक सभा घेत केंद्रासह राज्यसरकारवर प्रश्नांचा भडीमार केला. आज जंगलतोड झाली तिथे मी गेलो होतो, तोडलेली लाकडं रचून ठेवली होती. ते बघताना मला वाटलं जंगलाच्या अंतिम संस्काराला आलो आहे. इतक्या वर्षांची जुनी झाडं, कोणत्या तरी गुजरात्यासाठी म्हणून कापून टाकत आहेत. मला सांगा या प्रकल्पाची गरज काय आहे? या सगळ्या गोष्टींच्या मागचं षडयंत्र तुम्ही समजून घेतलं पाहिजे.

शेतकऱ्यांच्या मुलींच्या लग्नाची जबाबदारी शिवसेनेची

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाशिक दौऱ्यावर आहेत. त्यांनी त्र्यंबकेश्वर येथील ज्योतिर्लिंग मंदिराला भेट दिली आणि एका संत संमेलनात संतांची भेट घेतली. त्यांनी दोन महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. महाराष्ट्रातील दुष्काळामुळे शिवसेना शेतकऱ्यांच्या मुलींच्या लग्नाची व्यवस्था करेल आणि नाशिकमध्ये 2027 च्या कुंभमेळ्यादरम्यान सर्व 13 आखाड्यांसाठी भोजनाची व्यवस्थाही शिवसेना करेल. या घोषणेनंतर संतांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले.

एकनाथ शिंदे यांनी आनंद कुंभमेळ्यात सर्व 13 आखाड्यांतील संतांचे स्वागत केले. कुंभमेळ्याबाबत त्यांच्या अपेक्षा जाणून घेतल्या आणि इतर सर्व कामे लवकरच पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यावेळी महाराष्ट्रात अशी मागणी होत होती की, दुष्काळाच्या काळात कुंभमेळा का आयोजित केला जात आहे. त्यावर एकनाथ शिंदे म्हणाले, "असा कुंभमेळा काही वर्षांनीच येतो आणि काही लोक केवळ आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न करत आहेत. पण आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहोत.

त्यांच्या तयारीतील कोणतीही कमतरता आम्ही दूर करू," असे आश्वासन त्यांनी दिले. एकनाथ शिंदे नेमकं काय म्हणाले?



"शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठिशी आहे. देशात सध्या दुष्काळ आहे. अशा परिस्थितीत ज्यांनी आपल्या मुलींचं लग्न ठरवलं असेल ते आता लग्न कसं करतील? त्यांना मुलीच्या लग्नाची चिंता आहे.

यामुळे मी संत महात्मा मी आपल्याला विनंती करतो की, आपल्यादेखील आशीर्वाद शेतकऱ्यांवर असूद्यावा. शेतकऱ्यांच्या मुलींचं लग्न शिवसेना करेल. आपल्या इथे 13 आखाडे आहेत. या 13 आखाड्यांमध्ये संत महंत येतात. कुंभला येणाऱ्या सर्वांच्या जेवणाची व्यवस्था शिवसेना करेल", अशा दोन मोठ्या घोषणा एकनाथ शिंदे यांनी केल्या. शिवसेनेच्या नव्या मोहीमेची घोषणा दरम्यान,'भगवा खांद्यावर,शिवसैनिक बांधावर' या शिवसेनेच्या उपक्रमाचा नाशिकच्या हरसूल येथून शुभारंभ करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी आपल्या कार्यकर्ते, पदाधिकारी, आमदार, खासदार आणि मंत्र्यांना मोलाचं आवाहन केलं. "आपल्याला शेतकऱ्यांच्या मदतीला जाण्याचं काम करायचं आहे. दसरा मेळाव्यात मी सर्वांना शेतकऱ्यांच्या बांदावर जाण्याचं आवाहन केलं आहे. मंत्री, आमदार, खासदार, जिल्हाप्रमुख यांच्यासोबत कालदेखील बैठकीत बोललो. आता आपलं एकच काम या दुष्काळात होरपळत असणाऱ्या शेतकऱ्याच्या भावा, बहिणीच्या मागे उभे राहायचं. त्यांना मदत करायची.

महामार्गावर वाहनांचा महाजाम!

मुंबई- : अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मुंबई आणि ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. वर्सोवा पुलापासून विरार हद्दीपर्यंत सुमारे १५ ते २० किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. मंगळवारी बुधवारी सकाळपर्यंत कायम राहिल्याने अनेक वाहनचालकांना तासन् तास महामार्गावर अडकून पडावे लागले. ठाण्यातील बहुचर्चित प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या आंदोलनाचा थेट परिणाम महामार्गावरील वाहतुकीवर झाल्याचे सांगण्यात आले.

जुना प्रियकर अन् मुंबईतील फसवणूक!

जन सम्राट टाईम्स



जळगाव | प्रतिनिधी: उत्तर प्रदेशातून प्रियकराच्या मोहात पडून मुंबई गाठलेल्या तीन मुलांच्या आईचा अत्यंत संशयास्पद आणि दुर्दैवी अंत झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. उत्तर प्रदेशातील बिजनौर येथील रहिवासी असलेली रुखसाना ही महिला आपल्या तीन लहान मुलांना आणि पतीला सोडून मुंबईत प्रियकराकडे आली होती. मात्र, काही दिवसांतच ती बेपत्ता झाली आणि अखेर १८ ऑक्टोबर रोजी वांद्रे परिसरातील एका कचराकुंडीजवळील नाल्यात तिचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, उत्तर प्रदेशातील बिजनौरच्या सडकपूर गावातील रुखसाना हिचे लग्नापूर्वी तिच्याच गावातील साकीब नावाच्या तरुणासोबत प्रेमसंबंध होते. मात्र, सामाजिक परिस्थितीमुळे त्यांचे लग्न होऊ शकले नाही. रुखसानाचा विवाह कंठ गावातील एका तरुणाशी झाला आणि त्यांना तीन मुलेही झाली. संसार सुरळीत सुरू असतानाच, २०२६ मध्ये रुखसाना पुन्हा एकदा तिच्या जुन्या प्रियकराच्या (साकिब) संपर्कात आली. दोघांमधील संभाषण आणि भेटीगाठी वाढल्या. कुटुंबीयांनी तिची समजूत काढण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु रुखसानाने पती आणि निष्पाप मुलांसोबत राहण्यास ठाम नकार दिला. शेवटी हट्टाला पेटून ती मुंबईत ऑटो रिक्षा चालवणाऱ्या साकिबकडे निघून आली.मुंबईत आल्यानंतर रुखसानाला एका मोठ्या सत्याचा सामना करावा लागला. तिचा प्रियकर साकीब हादेखील आधीच विवाहित होता. काही दिवसांतच साकिबची पत्नीही मुंबईत राहण्यासाठी आली. यामुळे साकिबच्या पत्नीमध्ये आणि रुखसानामध्ये सतत भांडणे आणि तीव्र वाद सुरू झाले. याच वादाच्या पार्श्वभूमीवर, गत २६ सप्टेंबर रोजी रुखसाना मुंबईतील सांताक्रूझ परिसरातून अचानक रहस्यमयरित्या गायब झाली. ती घरी न परतल्याने साकिबने स्वतः पोलीस ठाण्यात जाऊन ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. पोलिसांनी शोध सुरू केला, पण कित्येक दिवस तिचा कोणताही पत्ता लागला नाही.अखेर १८ ऑक्टोबर रोजी वांद्रे परिसरातील एका कचराकुंडीजवळील नाल्यात एक दुर्गंधीयुक्त, कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला. पोलिसांनी पाहणी केली असता तो मृतदेह बेपत्ता रुखसानाचाच असल्याचे निष्पन्न झाले. या घटनेनंतर रुखसानाच्या वडिलांनी तिचा प्रियकर साकिबवरच रुखसानाची हत्या केल्याचा थेट आणि गंभीर आरोप केला आहे. ऐन विवाहाच्या आणि संसाराच्या वळणावर प्रियकरासाठी सर्वकाही सोडणाऱ्या रुखसानाच्या या शोकांतिकेमुळे तिच्या मूळ गावी आणि मुंबईत मोठी हळहळ व्यक्त होत आहे. रुखसानाच्या कुटुंबीयांनी कठोर न्यायाची मागणी केली असून, मुंबई पोलीस या हत्याकांडामागील नेमके गूढ उकलण्यासाठी सखोल तपास करत आहेत.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

महाराष्ट्राच्या राजकारणात पवारांची ताकद पुन्हा दिसली

प्रचाराला न जाता पडद्यामागून सूत्रे फिरवली, निकाल सर्वांसमोर!

जन सम्राट टाईम्स

पुणे : प्रतिनिधी: महाराष्ट्राच्या राजकारणात ज्येष्ठ नेते शरद पवार यांची ताकद आजही आहे तशीच अबाधित आहे. पक्षफुटीनंतरही न डगमगता 2024 च्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांच्या विरोधात रान पेटवणारे शरद पवार सर्वाधिक जागांवर आपले उमेदवार निवडून आणताना संपूर्ण देशाने पाहिलं. त्यावेळी शरद पवार हे स्वत: प्रचाराच्या रणधुमाळीत उतरले होते. तसेच सातारा लोकसभेच्या 2019 च्या पोटनिवडणुकीत शरद पवारांनी भर पावसात भाषण केलं होतं. त्यांच्या त्या एका सभेने संपूर्ण मतदान फिरलं होतं. शरद पवारांची ही ताकद फक्त प्रचारातच नाही तर प्रचारात न उतरता रणनीतीमध्ये कशी आहे हेच विधान परिषदेच्या सध्याच्या निवडणुकीत बघायला मिळत आहे. विधान परिषदेच्या दोन शिक्षक आणि तीन पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत प्रचंड चुरस बघायला मिळाली. पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपकडून स्मिता जाधव यांना उमेदवारी देण्यात आली होती. स्मिता जाधव यांचं शैक्षणिक, सामाजिक आणि प्रशासकीय कामकाज पाहता त्या भाजपच्या अत्यंत ताकदवार उमेदवार असल्याचं वातावरण तयार झालं होतं. विशेष म्हणजे स्मिता जाधव या शंभर टक्के जिंकतील, असा भाजपला आत्मविश्वास होता. पण निकाल आता सर्वांसमोर येताना दिसत आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या हर्षदा देशमुख जाधव या विजयाच्या उंबरठ्यावर असल्याची माहिती आहे.



विधान परिषदेच्या पाच जागांपैकी दोन जागांची मतमोजणी पूर्ण झाली असून निवडणूक आयोगाकडून दोन जागांचा अधिकृत निकाल जाहीर करण्यात आला आहे. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे आणि अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किरण सरनाईक विजयी झाल्याचं अधिकृतपणे जाहीर करण्यात आलं आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे आणि काँग्रेस अभिजीत वंजारी यांच्यात शेवटपर्यंत काँटे की टक्कर बघायला मिळत आहे. विशेष म्हणजे शरद पवारांच्या पक्षातून बंडखोरी केलेले अपक्ष उमेदवार नितेश कराळे मास्तर हेच या निवडणुकीत किंगमेकर ठरताना दिसत आहेत. त्यामुळे शरद पवारांचा पक्षाच्या शिलेदाराने इथेही ताकद दाखवून दिल्याचं स्पष्ट झालं आहे. पण कराळे गुरुजींवर पक्षाकडून कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. युती धर्माचे पालन न केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. शरद पवारांच्या पक्षाचे दोन शिलेदार विजयाच्या उंबरठ्यावर आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, पुणे पदवीधर मतदारसंघात शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार हर्षदा देशमुख जाधव या विजयाच्या उंबरठ्यावर आहेत. मतमोजणी शेवटच्या टप्प्यात आहे.मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतही शरद पवारांची ताकद बघायला मिळाली. इथे शरद पवारांकडून प्रतापसिंह पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. तर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसकडून सलग तीनवेळा निवडून आलेले तथा प्रदीर्घ राजकारण आणि प्रशासनाचा अनुभव असलेले सतीश चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली होती. मराठवाडा पदवीधर मतदारसंघात अजूनही मतमोजणी सुरु आहे. पण माहितीनुसार, शरद पवारांच्या पक्षाचे प्रतापसिंह पाटील हे सातत्याने आघाडीवर आहेत. पोस्टल मतांमध्ये सतीश चव्हाण आघाडीवर दिसत होते. पण प्रत्यक्ष मतमोजणी सुरु झाल्यापासून प्रत्येक फेरीत प्रतापसिंह पाटील हे सतीश चव्हाण यांच्यापासून काही मतांनी आघाडीवर बघायला मिळाले आहेत. अत्यंत चुरशीची ही लढत झाली. पण प्रतापसिंह पाटील हेच या ठिकाणी सध्या आघाडीवर असल्याची माहिती आहे.

BMC कर्मचाऱ्यांना 33000 रुपयांच्या बोनसची घोषणा!

शिक्षकांसह ९५ हजारांहून अधिक जणांना मिळणार लाभ

जन सम्राट टाईम्स

शिंदखेडा। प्रतिनिध : दिवाळीपूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) कर्मचाऱ्यांसाठी एक मोठी आनंदाची बातमी आहे. बीएमसीच्या महापौर रितू तावडे यांनी कर्मचाऱ्यांसाठी ३३,००० रुपयांच्या दिवाळी बोनसची घोषणा केली आहे. प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत बुधवारी झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महापौर रितू तावडे यांनी सांगितले की, बीएमसीच्या शिक्षण विभागात एकूण ९३,५०९ कर्मचारी आणि २,३६० शिक्षक कार्यरत आहेत. त्यांनी सांगितले की, २०२४-२५ या वर्षासाठी कर्मचाऱ्यांना मागील वर्षीच्या ३२,००० रुपयांच्या बोनसच्या तुलनेत ३१,००० रुपयांचा बोनस देण्यात आला आहे. यावर्षी कर्मचाऱ्यांच्या मागण्या आणि सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन बोनसची रक्कम ₹१,००० ने वाढवून ₹३३,००० करण्यात आली आहे. मुंबईतील विकासकामांची वाढती जबाबदारी आणि कर्मचाऱ्यांचे योगदान लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला, असे त्यांनी सांगितले. या बैठकीला कामगार समितीच्या अधिकाऱ्यांसह प्रशासनाचे प्रतिनिधित्व करणारे किशोर गांधी आणि देविदास क्षीरसागर यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. महापौरांनी सांगितले की, कर्मचारी बोनस वाढवण्याची मागणी करत होते. तथापि, सध्याच्या आर्थिक परिस्थितीवर चर्चा केल्यानंतर सर्व पक्षांनी या प्रस्तावाला सहमती दर्शवली. दरवर्षी अंदाजे २,००० ते २,५०० रुपयांनी बोनस वाढवण्याची परंपरा आहे आणि कर्मचाऱ्यांच्या मागण्या रास्त आहेत, असे त्यांनी सांगितले.महाराष्ट्र सध्या अनेक आव्हानांना तोंड देत आहे, त्यामुळे सर्व बाबी विचारात घेऊन एक संतुलित निर्णय घेण्यात आला, असेही त्यांनी सांगितले. महापौरांच्या मते,"जर शेतकरी संकटात असतील, तर मुंबईचीही सामाजिक जबाबदारी समजून घेण्याची जबाबदारी आहे." कर्मचाऱ्यांसाठी आणखी एक महत्त्वाची घोषणा करताना महापौरांनी सांगितले की, पगार आणि बोनस दोन्ही २ नोव्हेंबर रोजी एकाच वेळी दिले जातील, ज्यामुळे त्यांना चांगल्या प्रकारे दिवाळी साजरी करता येईल. बीएमसीच्या शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या अन्नाच्या मुद्द्यावर महापौरांनी सांगितले की, जर हे आरोप खरे ठरले, तर संबंधित स्वयंसेवी संस्थेला (NGO) निलंबित केले पाहिजे. मुलांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असेही त्या म्हणाल्या. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वितरित केल्या जाणाऱ्या टॅब्लेटच्या गुणवत्तेबद्दल उपस्थित केलेल्या प्रश्नांवर महापौरांनी सांगितले की, जर टॅब्लेट निकृष्ट दर्जाचे असतील, तर बीएमसी आयुक्तांनी हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे. त्यांनी स्पष्ट केले की, ही योजना आघाडी सरकारच्या काळात सुरू करण्यात आली होती आणि तेव्हाही त्यांनी टॅब्लेट वितरणाच्या काही पैलूंवर प्रश्न उपस्थित केले होते.आशा स्वयंसेवकांच्या बोनसच्या मागणीबाबत महापौरांनी सांगितले की, एका शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली होती. त्या बीएमसी आयुक्तांशी या विषयावर चर्चा करतील आणि कर्मचाऱ्यांच्या हितासाठी योग्य तोडगा काढण्याचा प्रयत्न करतील. काँग्रेसबद्दलच्या एका प्रश्नावर महापौरांनी सांगितले की, जनता मतदानाच्या माध्यमातून आपले मत व्यक्त करते आणि हीच लोकशाहीची सर्वात मोठी ताकद आहे. तिने असा दावा केला की, लोकांचा पक्षावर असलेला विश्वास निवडणुकीत दिसून येतो.बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) कर्मचाऱ्यांसाठी एक मोठी आनंदाची बातमी आहे. बीएमसीच्या महापौर रितू तावडे यांनी कर्मचाऱ्यांसाठी ३३,००० रुपयांच्या दिवाळी बोनसची घोषणा केली आहे. प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत बुधवारी झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महापौर रितू तावडे यांनी सांगितले की, बीएमसीच्या शिक्षण विभागात एकूण ९३,५०९ कर्मचारी आणि २,३६० शिक्षक कार्यरत आहेत. त्यांनी सांगितले की, २०२४-२५ या वर्षासाठी कर्मचाऱ्यांना मागील वर्षीच्या ३२,००० रुपयांच्या बोनसच्या तुलनेत ३१,००० रुपयांचा बोनस देण्यात आला आहे. यावर्षी कर्मचाऱ्यांच्या मागण्या आणि सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन बोनसची रक्कम ₹१,००० ने वाढवून ₹३३,००० करण्यात आली आहे. मुंबईतील विकासकामांची वाढती जबाबदारी आणि कर्मचाऱ्यांचे योगदान लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.



संपादकीय

अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी 'माणूस' हवा!

महिन्याचा पगार हातात पडला की सामान्य माणसाच्या घरात आर्थिक नियोजनाची धावपळ सुरू होते. किराणा, घरभाडे, मुलांचे शिक्षण, वीजबिल, आरोग्यावरील खर्च, कर्जाचे हप्ते आणि भविष्यासाठीची बचत या सगळ्यांचा ताळमेळ घालताना अनेक कुटुंबांची दमछाक होते. महिन्याच्या सुरुवातीला आखलेले आर्थिक गणित महिनाअखेरीस कोलमडू नये, यासाठी प्रत्येक रुपयाचा हिशेब ठेवावा लागतो

अशा परिस्थितीत महागाई वाढली, व्याजदर बदलले किंवा नोकरीच्या सुरक्षिततेबद्दल अनिश्चितता निर्माण झाली, तर त्याचा थेट परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर होतो. देशाची अर्थव्यवस्था किती वेगाने वाढत आहे, यापेक्षा आपल्या कुटुंबाचा खर्च भागतो आहे का, मुलांच्या शिक्षणासाठी पुरेसे पैसे आहेत का आणि उद्या रोजगार टिकेल का, हे प्रश्न त्याच्यासाठी अधिक महत्त्वाचे ठरतात. म्हणूनच अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे मोजमाप करताना आकडेवारीबरोबरच सामान्य माणसाच्या जीवनातील सुरक्षितता आणि समाधान यांचाही विचार होणे आवश्यक आहे. अर्थशास्त्र म्हणजे केवळ उत्पादन, उत्पन्न, व्याजदर आणि महागाई यांचे गणित नव्हे. अर्थव्यवस्था कशी चालते, तिच्यात चढ-उतार का निर्माण होतात आणि सरकारी धोरणांचा नागरिकांच्या निर्णयांवर कसा परिणाम होतो, याचा अभ्यासही अर्थशास्त्रात केला जातो. घरातील खर्चाचा निर्णय असो किंवा उद्योगाने नवीन कारखाना उभारण्याचा निर्णय असो, प्रत्येक आर्थिक कृतीमागे भविष्याबद्दलची अपेक्षा आणि विश्वास महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेचे स्थैर्य निर्माण करायचे असेल, तर केवळ आर्थिक निर्देशांक सुधारून चालणार नाही; नागरिकांचा विश्वास टिकवणे आणि त्यांच्या उत्पन्नाला सुरक्षितता देणेही तितकेच गरजेचे आहे. घराघरांतील निर्णयांचा अर्थव्यवस्थेवर परिणाम समजा, एखाद्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न ५० हजार रुपये आहे. घरातील दोघांपैकी एकाची नोकरी जाण्याची शक्यता निर्माण झाली, तर उत्पन्न सध्या तेवढेच असूनही कुटुंबाचा खर्च करण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. नवीन वाहन खरेदीचा निर्णय पुढे ढकलला जाईल, बाहेरचे खाणे कमी होईल आणि अनावश्यक खर्चांना कात्री लावली जाईल. भविष्यातील संकटाचा सामना करता यावा, यासाठी बचतीला प्राधान्य दिले जाईल. एखाद्या कुटुंबासाठी हा निर्णय योग्य आणि आवश्यक असला, तरी लाखो कुटुंबांनी एकाच वेळी खर्च कमी केला, तर बाजारातील मागणी घटू शकते. मागणी घटल्यास दुकानदारांची विक्री कमी होते, उद्योगांच्या उत्पादनावर परिणाम होतो आणि नवीन गुंतवणुकीचे निर्णय पुढे ढकलले जाऊ शकतात. परिणामी रोजगारनिर्मिती मंदावण्याची शक्यता निर्माण होते. यामुळे पुन्हा कुटुंबांच्या उत्पन्नावर दबाव येतो आणि खर्च आणखी कमी होतो. अशा प्रकारे सामान्य माणसाच्या आर्थिक असुरक्षिततेचा परिणाम व्यापक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. याउलट, रोजगार सुरक्षित असेल, उत्पन्न नियमित मिळत असेल आणि भविष्यातील परिस्थितीबद्दल विश्वास असेल, तर नागरिक खर्च करण्यास आणि उद्योग गुंतवणूक करण्यास अधिक तयार होऊ शकतात. यातून एक महत्त्वाचा निष्कर्ष पुढे येतो. अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी उत्पादन वाढविणे आवश्यक आहेच; पण त्या उत्पादनाला मागणी मिळेल, नागरिकांकडे खरेदी करण्याची क्षमता असेल आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील, याचीही खात्री करावी लागते. अन्यथा विकासाची चाके वेगाने फिरत असल्याचे चित्र दिसेल; परंतु त्या विकासाचा लाभ सामान्य माणसापर्यंत पोहोचणार नाही. व्याजदर, महागाई आणि धोरणांवरील विश्वास महागाई नियंत्रणात ठेवणे आणि आर्थिक विकासाला चालना देणे, ही रिझर्व्ह बँकेसमोरील महत्त्वाची आव्हाने आहेत. महागाई वाढत असताना व्याजदर वाढविण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. त्यामुळे कर्ज घेणे महाग होते आणि खर्चावर नियंत्रण येण्यास मदत होऊ शकते. मात्र त्याच वेळी गृहकर्ज, वाहनकर्ज आणि उद्योगांसाठीचे कर्ज महागल्याने कुटुंबांच्या मासिक बजेटवर तसेच व्यवसायांच्या विस्तार योजनांवर परिणाम होऊ शकतो.

तारापारमधील वीज समस्येवर लोकप्रतिनिधीआक्रमक; शेतकऱ्यांच्या अनियमित वीजपुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर; !

महावितरणच्या अधिकाऱ्यांना धरले धारेवर!

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी : नशिराबादसह भादली, कडगाव आणि जळगाव खुर्द हद्दीतील तारापार परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. या गंभीर प्रश्नावर लोकनियुक्त नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील आणि भाजपचे गटनेते तथा नगरसेवक, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष लालचंद भाऊ पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली. शेतकऱ्यांसह महावितरणच्या नशिराबाद उपविभागीय कार्यालयात धडक देत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला आणि वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडविण्याची मागणी केली. आधीच दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतीसमोर संकट उभे असताना वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान लक्षात घेता वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली. निवेदनानंतर दोन दिवसच वीजपुरवठा सुरळीत! तारापार परिसरातील वीजपुरवठा



वारंवार खंडित होत असल्याने यापूर्वीही संबंधित यंत्रणेकडे निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांसाठी वीजपुरवठा सुरळीत झाला; मात्र पुन्हा परिस्थिती जैसे थे झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. वारंवार उद्भवणाऱ्या या समस्येमुळे शेतीच्या कामांचे नियोजन कोलमडत असून, पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. वीजपुरवठ्याच्या अनियमिततेमुळे शेतीचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत असून, वारंवार तक्रारी करूनही कायमस्वरूपी तोडगा निघत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांना जाब; पालकमंत्र्यांकडेही प्रश्न मांडला या वेळी नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील आणि लालचंद भाऊ पाटील यांनी महावितरणचे संबंधित अधिकारी सोनवणे आणि जोशी यांच्याकडे वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांना नियमित आणि सुरळीत वीजपुरवठा मिळावा, तसेच या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन हा विषय पालकमंत्र्यांच्याही निदर्शनास आणून देण्यात आला आहे. दरम्यान, महावितरणच्या अधिकाऱ्यांनी पुढील अर्ध्या तासात वीजपुरवठ्याची समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. मात्र, दिलेल्या वेळेत समस्या सुटली नाही, तर पुढील भूमिका ठरवून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा लोकप्रतिनिधींनी दिला. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तडजोड नाही! "शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. शेतकऱ्यांना नियमित आणि सुरळीत वीजपुरवठा मिळेपर्यंत त्यांचा आवाज ठामपणे मांडत राहू," अशी भूमिका लोकप्रतिनिधींनी यावेळी स्पष्ट केली. या प्रसंगी भादली, कडगाव, जळगाव खुर्द आणि नशिराबाद हद्दीतील तारापार परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने महावितरणच्या नशिराबाद उपविभागीय कार्यालयात उपस्थित होते. आता महावितरणने दिलेल्या आश्वासनानुसार वीजपुरवठा सुरळीत होतो का आणि शेतकऱ्यांच्या या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघतो का, याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.नशिराबादसह भादली, कडगाव आणि जळगाव खुर्द हद्दीतील तारापार परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. या गंभीर प्रश्नावर लोकनियुक्त नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील आणि भाजपचे गटनेते तथा नगरसेवक, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष लालचंद भाऊ पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली. शेतकऱ्यांसह महावितरणच्या नशिराबाद उपविभागीय कार्यालयात धडक देत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला आणि वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडविण्याची मागणी केली.

दिवाळी खरेदीसाठी मुंबईकरांना खास संधी!

जन सम्राट टाईम्स

नांदगाव | प्रतिनिधी : देशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्रासह देशभरातील उद्योजकांना त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी तसेच महिला बचत गट आणि व्यावसायिकांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने 'स्वदेशी दिवाळी उत्सव २०२६' या तीन दिवसीय भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शिवसेनेच्या प्रवक्त्या आणि महोत्सवाच्या आयोजक ॲड. सुशिबेन शाह यांनी दिली. या महोत्सवाचे हे दुसरे वर्ष असून, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि राज्यसभेचे खासदार मा. श्री. मिलिंद देवरा यांच्या उपस्थितीत महोत्सवाचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. मुंबईतील मलबार हिल येथील प्रियदर्शिनी पार्क येथे शुक्रवार, ३० ऑक्टोबर ते रविवार, १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवारी, ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता उद्घाटन सोहळा होणार आहे.याबाबत अधिक माहिती देताना ॲड. सुशिबेन शाह म्हणाल्या की, या महोत्सवात ११० हून अधिक



स्टॉल्सच्या माध्यमातून स्वदेशी उत्पादने, हस्तकला, स्थानिक उद्योजकांची उत्पादने तसेच महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री करण्यात येणार आहे. नागरिकांसाठी २० हून अधिक मोफत कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले असून, पपेट शोदेखील महोत्सवाचे विशेष आकर्षण असणार आहे.स्थानिक उत्पादक, लघुउद्योजक, महिला बचत गट आणि नवउद्योजकांना ग्राहकांपर्यंत थेट पोहोचण्याची संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या व्यवसायाला चालना देणे आणि नागरिकांनी स्वदेशी उत्पादनांना प्राधान्य देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. दिवाळीच्या खरेदीच्या माध्यमातून देशांतर्गत उत्पादनांना आणि स्थानिक व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्याचा संदेश या महोत्सवातून दिला.

नशिराबादमध्ये अतिक्रमण हटविण्यापूर्वी हातगाडीधारकांना पर्यायी जागा द्या!

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी : नशिराबाद शहरातील बाजारपेठेत व्यवसाय करणाऱ्या हातगाडी व ठेलेधारकांना अतिक्रमण हटविण्यापूर्वी पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जळगाव जिल्हाध्यक्ष मुकुंदा भाऊ रोटे यांनी नशिराबाद नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. नशिराबाद नगरपरिषदेच्या वतीने बाजारपेठेतील हातगाडी व ठेलेधारकांना अतिक्रमण हटविण्याबाबत सूचना देण्यात आल्याचे समजते. शहरातील स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आणि सार्वजनिक जागांचे नियोजन राखणे आवश्यक असले, तरी या कारवाईमुळे छोट्या व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होऊ नये, याचीही काळजी प्रशासनाने घ्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. छोट्या व्यावसायिकांच्या रोजगाराचा प्रश्न बाजारपेठेत हातगाडी व ठेले लावून व्यवसाय करणारे अनेक व्यावसायिक सामान्य आर्थिक परिस्थितीत जीवन जगत आहेत. त्यांचा व्यवसाय हाच कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार आहे. या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नावर कुटुंबाचा खर्च, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन गरजा भागवल्या जातात. आर्थिक अडचणी आणि बाजारपेठेतील मंदीमुळे छोट्या व्यावसायिकांसमोर आधीच अनेक आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत पर्यायी जागेची व्यवस्था न करता त्यांना व्यवसायाच्या ठिकाणाहून हटविल्यास त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने या विषयाकडे सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून पाहण्याची गरज असल्याचे रोटे यांनी निवेदनात म्हटले आहे. प्रथम पर्यायी जागा, त्यानंतर अतिक्रमण हटविण्याची कारवाई नगरपरिषदेने संबंधित हातगाडी व ठेलेधारकांशी चर्चा करून शहरातील योग्य ठिकाणी त्यांच्यासाठी पर्यायी जागा निश्चित करावी. व्यवसायासाठी नियोजनबद्ध जागा उपलब्ध करून दिल्यास वाहतूक आणि स्वच्छतेचे प्रश्न सोडविण्यास मदत होईल, तसेच छोट्या व्यावसायिकांचा रोजगारही सुरक्षित राहू शकेल, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. शहराचा विकास आणि सर्वसामान्य नागरिकांचा उदरनिर्वाह या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे केवळ अतिक्रमण हटविण्यापुरती कारवाई न करता, संबंधित व्यावसायिकांच्या रोजगाराची पर्यायी व्यवस्था करावी. हातगाडी व ठेलेधारकांना प्रथम पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी आणि त्यानंतर नियमानुसार अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावी, अशी प्रमुख मागणी मुकुंदा भाऊ रोटे यांनी केली आहे. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन नगरपरिषद प्रशासनाने छोट्या व्यावसायिकांच्या हिताचा विचार करीत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

पोलीस कोठडीतील आरोपीच्या मृत्यूप्रकरणी PSI सह दोन कर्मचारी निलंबित

स्वतःला जखमी करून घेतलेल्या आरोपीचा मृत्यू; भिंतीवर डोके आपटून जखमी

जन सम्राट टाईम्स

पाचोरा । प्रतिनिधी : करमाळा पोलीस कोठडीत असताना स्वतःला जखमी करून घेतलेल्या कृष्णा ज्ञानदेव मोहिते (वय 38, रा. बिटरगाव, सांगवी) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी एका पीएसआयसह दोन पोलीस कॉन्स्टेबल अशा तिघांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास सीआयडीमार्फत सुरू असून, संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांच्या निलंबनाची शिफारस तपास अधिकाऱ्यांनी केल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही कारवाई केल्याचे समजते. कृष्णा ज्ञानदेव मोहिते याच्याविरुद्ध त्यांच्या नातेवाईक असलेल्या महिलेने फिर्याद दिली होती. या फिर्यादीवरून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला 20 ऑक्टोबर 2026 ला अटक करण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयाकडून त्याला पोलीस कोठडी मिळाली होती. पोलीस कोठडीतील पहिल्याच दिवशी 20 ऑक्टोबर रोजी कृष्णा मोहिते याने भिंतीवर डोके आपटून स्वतःला जखमी करून घेतले होते. त्यानंतर त्याला उपचारासाठी प्रथम करमाळा येथील कुटीर रुग्णालयात आणि पुढील उपचारासाठी सोलापूर



येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना 23 ऑक्टोबर रोजी त्याचा मृत्यू झाला. पोलीस कोठडीतील आरोपीचा मृत्यू झाल्याने या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली. नातेवाईकांनी त्याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली होती. दरम्यान, या प्रकरणाचा तपास गुप्तचर विभागाकडे सोपविण्यात आल्याची माहिती असून, सीआयडीमार्फतही तपास सुरू आहे. या तपासा दरम्यान संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने त्याचदिवशी कार्यरत असणारे पीएसआय उघडे तसेच पोलीस कॉन्स्टेबल रणदील आणि कादगे या तिघांना निलंबित करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तिघांना निलंबित केले असल्याचे समजते. कृष्णा मोहिते याच्या मृत्यूची नेमकी परिस्थिती काय होती आणि या प्रकरणात कोणाची जबाबदारी निश्चित होते हे सीआयडीच्या पुढील तपासातून स्पष्ट होणार आहे.करमाळा पोलीस कोठडीत असताना स्वतःला जखमी करून घेतलेल्या कृष्णा ज्ञानदेव मोहिते (वय 38, रा. बिटरगाव, सांगवी) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी एका पीएसआयसह दोन पोलीस कॉन्स्टेबल अशा तिघांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास सीआयडीमार्फत सुरू असून, संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांच्या निलंबनाची शिफारस तपास अधिकाऱ्यांनी केल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही कारवाई केल्याचे समजते. कृष्णा ज्ञानदेव मोहिते याच्याविरुद्ध त्यांच्या नातेवाईक असलेल्या महिलेने फिर्याद दिली होती. या फिर्यादीवरून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला 20 ऑक्टोबर 2026 ला अटक करण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयाकडून त्याला पोलीस कोठडी मिळाली होती. पोलीस कोठडीतील पहिल्याच दिवशी 20 ऑक्टोबर रोजी कृष्णा मोहिते याने भिंतीवर डोके आपटून स्वतःला जखमी करून घेतले होते. त्यानंतर त्याला उपचारासाठी प्रथम करमाळा येथील कुटीर रुग्णालयात आणि पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त कीर्तन सोहळा!

जन सम्राट टाईम्स

अण्णानगर | प्रतिनिधी : लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अण्णानगर येथे शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सरदार वल्लभभाई पटेल उत्सव समिती, अण्णानगर यांच्या वतीने या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कीर्तन सोहळा ३० ऑक्टोबर रोजी रात्री ७:३० ते १०:०० या वेळेत अण्णानगर येथील खालची आळी, आठवडे बाजार परिसरात पार पडणार आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. श्री. सोपान महाराज कनेटकर यांचे सुश्राव्य कीर्तन होणार असून, त्यांच्या



कीर्तनातून उपस्थित भाविकांना भक्तिरसाचा आनंद घेता येणार आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या सोहळ्याला परिसरातील भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, तसेच कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरदार वल्लभभाई पटेल उत्सव समिती, अण्णानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

महाराष्ट्रात स्वतंत्र महिला SRPF बटालियन स्थापन करा!

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: | महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दलात (SRPF) महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र बटालियन गट स्थापन करण्यात यावेत, अशी महत्त्वपूर्ण मागणी पोलीस बॉईज असोसिएशन, धुळे जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात धुळे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश रामदास कदम यांना निवेदन सादर करण्यात आले. राज्यातील महिला पोलीस कर्मचाऱ्यांना अधिक संधी उपलब्ध करून देण्यासोबतच बंदोबस्त व्यवस्थेचे नियोजन अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने ही मागणी करण्यात आली आहे. सोसिएशनचे जिल्हाध्यक्ष जाकीर शेख यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनातून राज्य सरकारचे लक्ष महिला पोलिसांच्या प्रश्नांकडे वेधण्यात आले. केंद्रीय सुरक्षा दलांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही SRPF मध्ये महिलांसाठी स्वतंत्र बटालियन गट स्थापन करावेत, अशी भूमिका असोसिएशनने मांडली आहे. केंद्रीय सुरक्षा दलांच्या धर्तीवर स्वतंत्र गटाची मागणी केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF), केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF), सीमा सुरक्षा दल (BSF) आणि भारत-तिबेट सीमा पोलीस दल (ITBP) यांसारख्या सुरक्षा दलांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही महिला पोलिसांसाठी स्वतंत्र बटालियन गट उभारण्याची आवश्यकता निवेदनात अधोरेखित करण्यात आली आहे. गणेशोत्सव, दुर्गोत्सव, कुंभमेळा, निवडणूक बंदोबस्त, व्हीआयपी सुरक्षा, विविध आंदोलने तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या परिस्थितीत महिला पोलीस कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अशा वेळी स्वतंत्र महिला बटालियन गट उपलब्ध असल्यास बंदोबस्तासाठी आवश्यक मनुष्यबळाचे नियोजन अधिक सुसूत्रपणे करता येऊ शकते, असे असोसिएशनचे म्हणणे आहे. स्वतंत्र महिला बटालियन गट स्थापन झाल्यास महिला कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या बंदोबस्ताच्या कामांमध्ये संधी उपलब्ध होऊ शकतात. तसेच महिला पोलिसांचे मनुष्यबळ नियोजन, विशेष बंदोबस्तासाठी आवश्यक तैनाती आणि प्रशासकीय व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यास मदत होऊ शकते, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. महिला पोलीस कर्मचाऱ्यांची वाढती जबाबदारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या विविध आव्हानांचा विचार करून राज्य सरकारने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, असे आवाहन असोसिएशनने केले आहे. या निवेदनप्रसंगी पोलीस बॉईज असोसिएशनचे धुळे जिल्हाध्यक्ष जाकीर शेख, उपजिल्हाध्यक्ष मोहसीन सलीम शेख, सचिव अस्लम सय्यद, विधी सल्लागार ॲड. कृष्ण निमगले, शहराध्यक्ष अनिल विश्वनाथ जाधव, उपाध्यक्ष जमीर वासियोद्दीन शेख आणि कार्याध्यक्ष जॉनी सर यांच्यासह असोसिएशनचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

दुष्काळाचे सावट असताना खडक्या येथे जलसंधारणाचा पुढाकार!

वाहून जाणारे पाणी अडवून भूजलपातळी वाढविण्यासाठी ग्रामस्थांचे प्रयत्न

जन सम्राट टाईम्स

धडगाव । प्रतिनिधी: धडगाव तालुक्यात कमी पावसामुळे पाणीटंचाईची चिंता वाढत असताना, खडक्या गावातील ग्रामस्थांनी जलसंधारणासाठी पुढाकार घेतला आहे. खडक्या हद्दीतील खाड नदीवरील पुलाशेजारी वनराई बंधारे उभारण्याचा उपक्रम राबविण्यात येत असून, नदीतून वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा स्थानिक जलसाठा वाढविण्यासाठी उपयोग करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी केलेला हा पुढाकार महत्त्वपूर्ण मानला जात आहे. वाहून जाणारे पाणी अडविण्यावर भर पावसाळ्यात नदीतून वाहून जाणारे पाणी अडवून ते परिसरात जिरण्यास मदत करणे, तसेच भूजलपातळी वाढविण्यास हातभार लावणे, हा वनराई बंधाऱ्यांमागील प्रमुख उद्देश आहे. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवून त्याचा उपयोग केल्यास परिसरातील विहिरी आणि बोअरवेलमधील पाणीसाठा सुधारण्यास मदत होऊ शकते. तसेच शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्याच्या दृष्टीनेही असे उपक्रम उपयुक्त ठरतात. ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या गंभीर होत असताना जलसंधारणाच्या माध्यमातून उपलब्ध पाण्याचा योग्य विनियोग करणे गरजेचे बनले आहे. याच पार्श्वभूमीवर खडक्या येथे वनराई बंधारे उभारण्याचा प्रयत्न करण्यात



येत आहे. ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग या जलसंधारण उपक्रमात सरपंच नवलसिंग वळवी, उपसरपंच सुरेश वळवी, कारभारी सिताराम वळवी, सुरसिंग वळवी, राशा पावरा, सुनील वळवी, ग्रामपंचायत सदस्य गणेश वळवी यांच्यासह गावातील ग्रामस्थ सहभागी झाले. पाणी अडवा, पाणी जिरवा या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत ग्रामस्थांनी स्थानिक पातळीवर जलसंधारणाचे काम हाती घेतले आहे. अशा उपक्रमांमुळे पाण्याचे महत्त्व अधोरेखित होण्यासोबतच सामूहिक सहभागातून जलस्रोतांचे संवर्धन करण्याची प्रेरणाही मिळते.जलसंधारणातून पाणीटंचाईवर मात करण्याचा प्रयत्न पाणीटंचाईच्या काळात पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असतो. त्यामुळे उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन, पावसाचे पाणी अडविणे आणि भूजलपातळी वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. खडक्या येथील वनराई बंधाऱ्यांचा उपक्रम याच दिशेने टाकलेले पाऊल आहे. या उपक्रमाचा परिसरातील जलसाठ्यावर किती परिणाम होतो, हे आगामी काळात स्पष्ट होईल. मात्र, पाणीटंचाईच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी ग्रामस्थांनी दाखविलेला पुढाकार जलसंधारणाच्या दृष्टीने निश्चितच महत्त्वाचा आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत प्रतापराव पाटलांची दमदार एन्ट्री



जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी : जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (जेडीसीसी) निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धरणगाव तालुक्यातील राजकीय आणि सहकार क्षेत्रातील हालचालींना वेग आला आहे. युवा नेतृत्व तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव गुलाबराव पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल करत निवडणुकीच्या रिंगणात प्रवेश केला आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे धरणगाव तालुक्यातील सहकार क्षेत्रात उत्सुकता निर्माण झाली असून, समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत अनुभवी सहकार नेत्यांसोबत नव्या पिढीतील नेतृत्वही पुढे येत असल्याने निवडणुकीतील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रतापराव पाटील यांच्या उमेदवारीला विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि समर्थकांनी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला. सहकार क्षेत्रात युवा नेतृत्वाची एन्ट्री राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे सुपुत्र असलेल्या प्रतापराव पाटील यांनी यापूर्वी जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या माध्यमातून त्यांनी सहकार क्षेत्रात आपली दावेदारी मांडली आहे. शेतकरी, सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य मिळावे, तसेच सहकार क्षेत्रात नव्या विचारांना संधी मिळावी, अशी अपेक्षा त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठांचा अनुभव आणि युवा नेतृत्वाचा उत्साह यांची सांगड घालण्याच्या दृष्टीने त्यांच्या उमेदवारीकडे पाहिले जात आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना मान्यवरांची उपस्थिती प्रतापराव पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि समर्थक उपस्थित होते. यामध्ये दूध संघाचे संचालक रमेशअप्पा पाटील, तालुकाप्रमुख शिवराज पाटील, डी. ओ. पाटील, उपजिल्हाप्रमुख शरद पाटील, विधानसभा क्षेत्रप्रमुख संजय पाटील, अनिल भोळे, जितेंद्र पाटील, निंबाजीराव साहेबराव पाटील, वैशाली पाटील, प्रशांत झंवर, माजी सरपंच अरुण पाटील आणि दीपक भदाणे यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता. या उमेदवारी अर्जासाठी मीराबाई संजय पाटील यांनी सूचक म्हणून भूमिका बजावली. समर्थकांच्या उपस्थितीत अर्ज दाखल झाल्याने धरणगाव तालुक्यातील सहकार क्षेत्रातील निवडणुकीच्या चर्चेला अधिक वेग आला आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीकडे लक्ष जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील सहकार आणि कृषी अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची संस्था आहे.

महर्षी भगवान वाल्मिकी जयंतीनिमित्त पुण्यात विनम्र अभिवादन!

राजीव गांधी वाचनालयात मान्यवरांनी वाहिली आदरांजली

जन सम्राट टाईम्स

पुणे। प्रतिनिधी : आद्यगुरू आणि आद्यकवी महर्षी भगवान वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त राजीव गांधी विचार प्रसारक मंडळ ट्रस्टच्या वतीने पुण्यातील ससून कॉलनी येथील राजीव गांधी वाचनालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महर्षी भगवान वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक सुधीर दादा जयंती, पुणे शहर कॅन्टोन्मेंट विभागाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष नरेश जाधव आणि बाबूजी बेद यांच्या हस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. महर्षी भगवान वाल्मिकी यांनी आपल्या साहित्य आणि विचारांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीला महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून



त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला महेंद्र लालबिगे, मुकेश भाई चव्हाण, ससून पंचायतीचे पंचप्रमुख देवदास कसोटीया, बलरामजी लखन, शैलेंद्र चव्हाण, विद्यार्थी सेवा संघाचे विश्वस्त कनव भाई चव्हाण, 'हॅपी टू हेल्प' संस्थेचे कुणालजी करोते, मनोज निंदाने, संतोष चव्हाण, परेश चव्हाण, प्रणव निनारीया, जगदीश चव्हाण आणि हेमराज साळुंखे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन ससून व बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तृतीय श्रेणी पतसंस्थेचे संचालक प्रमोद निनारीया आणि माजी स्वीकृत नगरसेवक तथा राजीव गांधी विचार प्रसारक मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष विनोद निनारीया यांनी केले. यावेळी महर्षी भगवान वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक सुधीर दादा जयंती, पुणे शहर कॅन्टोन्मेंट विभागाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष नरेश जाधव आणि बाबूजी बेद यांच्या हस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. महर्षी भगवान वाल्मिकी यांनी आपल्या साहित्य आणि विचारांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीला महत्त्वपूर्ण योगदान दिले.

नव्या ग्रामपंचायतीला पाण्याचे बळ! डॉ. हेडगेवार नगरसाठी १८ कोटी १७ लाखांची पाणीपुरवठा योजना

जन सम्राट टाईम्स

धरणगाव/जळगाव (प्रतिनिधी): धरणगाव तालुक्यातील डॉ. हेडगेवार नगरच्या विकासाला आता नवी गती मिळणार आहे. स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या निर्मितीनंतर गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, तब्बल १८ कोटी १७ लाख ३३ हजार रुपयांच्या स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजनेला राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे या योजनेला मंजुरी मिळाल्याचे सांगण्यात आले आहे. जलजीवन मिशनअंतर्गत विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात आलेल्या या योजनेचा शासन निर्णय मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला. त्यामुळे डॉ. हेडगेवार नगरमधील नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. स्वतंत्र ग्रामपंचायतीनंतर पाणीपुरवठ्याला प्राधान्य डॉ. हेडगेवार नगरला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाल्यानंतर



गावातील मूलभूत सुविधांचा विकास करण्याची गरज निर्माण झाली होती. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय होता. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी पाणीपुरवठा योजनेसाठी पाठपुरावा केला. त्यानंतर राज्य शासनाने योजनेला प्रशासकीय मान्यता दिल्याने ग्रामपंचायतीच्या विकासाला आर्थिक बळ मिळाले आहे. उच्चाधिकार समितीच्या मान्यतेनंतर शासनाचा निर्णय या योजनेचा दरडोई खर्च निर्धारित निकषांपेक्षा अधिक असल्याने पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीची मान्यता आवश्यक होती. संबंधित प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनाने योजनेला हिरवा कंदील दिला आहे. प्रत्येक घराला नळजोडणी देण्याचे नियोजन या पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. योजनेच्या आराखड्यानुसार प्रतिव्यक्ती प्रतिदिन ५५ लिटर पाणीपुरवठ्याची क्षमता निश्चित करण्यात आली असून, प्रत्येक घरापर्यंत नळजोडणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. विशेष म्हणजे, जलजीवन मिशनच्या राज्य हिश्श्यातून ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया आणि निविदा कार्यवाही पूर्ण करून योजना निर्धारित कालावधीत कार्यान्वित करण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर सोपविण्यात आली आहे. पाणीप्रश्न सुटण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल स्वतंत्र ग्रामपंचायतीची निर्मिती आणि त्यानंतर मोठ्या निधीच्या पाणीपुरवठा योजनेला मिळालेली मंजुरी, या दोन्ही घडामोडी डॉ. हेडगेवार नगरच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जात आहेत. भविष्यातील लोकसंख्या आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन आखण्यात आलेल्या या योजनेमुळे नागरिकांना अधिक सक्षम पाणीपुरवठा व्यवस्था उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. या योजनेला मंजुरी मिळाल्याबद्दल डॉ. हेडगेवार नगरमधील ग्रामस्थांनी पाणीपुरवठा मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत. आता योजनेची पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात कधी होते.

जीवनातील आनंदासाठी बुद्धांच्या मानवतावादी विचारांची गरज!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: बदलत्या जीवनशैलीमुळे दैनंदिन जीवनातील ताणतणाव वाढत असून, मानव आपली वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक मानसिक शांती हरवून बसला आहे. भौतिक सुखाची साधने उपलब्ध असूनही माणूस जगण्यातील आनंद गमावत असल्याचे चित्र समाजात दिसते. त्यामुळे जीवनातील निखळ आनंद प्राप्त करण्यासाठी बुद्धांच्या मानवतावादी आणि विज्ञाननिष्ठ विचारांची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. जतीन मेढे यांनी केले. अकलूद येथील संघर्ष विहारात आयोजित वर्षावास समाप्तीच्या धम्म प्रबोधन कार्यक्रमात ते बोलत होते.' चला, धम्माने आपले जीवन आनंदी करू या' 'चला, धम्माने आपले जीवन आनंदी करू या' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. मेढे म्हणाले की, बुद्धांचा धम्म विज्ञाननिष्ठ जाणीव आणि विवेकपूर्ण आचरणाची शिकवण देतो. जीवनात दुःख आहे आणि त्या दुःखावर मात कशी करायची, याचा मार्ग बुद्धांनी सांगितला आहे. स्वार्थ, मोह, गर्व, अहंकार आणि खोटेपणा यांचा त्याग



करून माणसाने वास्तव स्वीकारत जीवन जगले, तर दुःख कमी होऊन आनंदाच्या दिशेने वाटचाल करता येते. स्वतःच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता प्रत्येक व्यक्तीत असते. त्यासाठी वास्तवाचा स्वीकार आणि विवेकपूर्ण आचरण महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रेरणादायी यावेळी प्रमुख पाहुणे आयुध निर्माणी वरणगावचे वरिष्ठ अधिकारी धनेश्वर चौधरी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास आणि त्यांचे ऐतिहासिक कार्य यांची सविस्तर माहिती दिली. बहुजन समाजाने बाबासाहेबांच्या विचारांतून आणि आचारांतून प्रेरणा घेऊन त्यांच्या कार्याचा आदर्श आपल्या जीवनात रुजवावा, असे आवाहन त्यांनी केले. फैजपूर महाविद्यालयाचे प्रा. दिलीप बोदडे यांनी बुद्धांनी सांगितलेल्या पंचशील आणि अष्टांगिक मार्गाचे महत्त्व विशद केले. या तत्त्वांचे व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात आचरण केल्यास व्यक्तीसह संपूर्ण कुटुंबाचे जीवन मंगलमय होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. धम्मतत्त्वज्ञान आचरणात आणण्याचे आवाहन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विनोद तायडे (गुरुजी) होते. अध्यक्षीय समारोप करताना त्यांनी जीवनातील धम्मतत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ विचार ऐकण्यापुरते मर्यादित न राहता ते प्रत्यक्ष आचरणात आणावेत आणि त्यातून स्वतःचा विकास साधावा, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन शैलेंद्र अडकमोल सर यांनी केले. या धम्म प्रबोधन कार्यक्रमाला अकलूद येथील धम्म उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळी निधीसाठी जाहीर केलेला 11 लाखांचा धनादेश मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द!

आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी वाढदिवशी दिलेला शब्द पाळला; सामाजिक बांधिलकीचे दर्शन

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जाहीर केलेल्या ११ लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश धुळे शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा उद्योजक ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त जाहीर केलेली मदत प्रत्यक्षात देत आमदार अग्रवाल यांनी दिलेला शब्द पाळला आहे. त्यांच्या या उपक्रमातून शेतकऱ्यांप्रती सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले आहे. वाढदिवसाच्या सोहळ्यात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीची घोषणा ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त ४ आणि ५ ऑक्टोबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती आणि शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाची जाणीव ठेवून या सोहळ्यात सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले. यावेळी प्रसिद्ध गायक हंसराज रघुवंशी यांच्या भक्तिगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पावसासाठी आणि शेतकऱ्यांवरील संकट दूर होण्यासाठी वरुणराजाला साकडे घालण्याचा भाव या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला. तसेच,



शेतकऱ्यांना उपजीविकेसाठी आधार मिळावा, या उद्देशाने ११ शेतकऱ्यांना ११ दुभत्या गायींचे वाटप करण्यात आले. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. त्याचवेळी राज्याच्या दुष्काळी निधीसाठी ११ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी केली होती. मुंबईत मुख्यमंत्र्यांकडे धनादेश सुपूर्द वाढदिवसाच्या सोहळ्यात जाहीर केलेल्या मदतीची पूर्तता करत आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ११ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी जलसंपदामंत्री गिरीश महाजन, जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल आणि भरत अग्रवाल उपस्थित होते. दुष्काळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आर्थिक योगदान देण्याच्या या उपक्रमाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले. सामाजिक बांधिलकी जपत दिलेला शब्द पूर्ण केल्याबद्दल त्यांनी आमदार अग्रवाल आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कार्याचा गौरव केला. सामाजिक बांधिलकीचा आदर्श वाढदिवसाचा सोहळा केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता, त्यातून शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न अग्रवाल कुटुंबीयांनी केला. एका बाजूला ११ शेतकऱ्यांना दुभत्या गायींचे वाटप, तर दुसऱ्या बाजूला राज्याच्या दुष्काळी निधीसाठी ११ लाख रुपयांचे योगदान, अशा दोन उपक्रमांतून शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत संवेदनशीलता व्यक्त करण्यात आली. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याच्या या उपक्रमाची धुळे जिल्ह्यात चर्चा होत असून, सामाजिक जबाबदारी जपणाऱ्या अशा प्रयत्नांमुळे संकटग्रस्त शेतकऱ्यांना आधार देण्याचा संदेश मिळत आहे.राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जाहीर केलेल्या ११ लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश धुळे शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.

शिंदखेड्यात बालाजी रथोत्सवात कोयत्याने दहशत!

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: शिंदखेडा शहरात भगवान बालाजींच्या रथोत्सवाला गालबोट लावणाऱ्या घटनेत कोयता भिरकावत भाविकांमध्ये दहशत निर्माण केल्याच्या आरोपावरून शिंदखेडा पोलिसांनी एका तरुणाला अटक केली आहे. रोशन एकनाथ चौधरी (वय २३, रा. बडगुजर गल्ली, शिंदखेडा) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव असून, त्याच्याकडून कोयता जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ ऑक्टोबर रोजी शिंदखेडा शहराचे आराध्य दैवत असलेल्या भगवान बालाजींचा रथोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्यासाठी भाविकांची मोठी उपस्थिती होती. मात्र, उत्सवाच्या वातावरणात एका तरुणाने कोयता भिरकावत दहशत निर्माण केल्याचा प्रकार घडल्याने परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच शिंदखेडा पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत संशयित रोशन चौधरी याला ताब्यात घेतले. जप्त करण्यात आला आहे. संबंधित हत्यार त्याने कुठून आणले आणि या घटनेमागील नेमके कारण काय, याचा पुढील तपास शिंदखेडा पोलीस करीत आहेत. ही कारवाई जिल्हा विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. शिंदखेडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मयूर भामरे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली. धार्मिक उत्सवाच्या वेळी कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी तातडीने कारवाई केल्याने परिसरात या घटनेची चर्चा सुरू आहे.

गिटारीविषयीची रंजक माहिती

संगीताच्या क्षेत्रात गिटारीचा वापर प्राधान्याने केला जातो. खास करून पाश्चिमात्य संगीतामध्ये गिटार हा अविभाज्य भाग आहे. गिटारीशी संबंधित काही गोष्टी अनेकांना माहीत नसतात. त्यांविषयी...

अजबगजब

१) जगातील सर्वांत मोठ्या आणि सर्वाधिक आवाज असलेल्या वाजवता येणाऱ्या गिटारची लांबी ११.६४ मीटर म्हणजे ३८ फुटांपेक्षाही अधिक आहे. याची रुंदी १६ फुट तर वजन ४४६ किलोग्रॅम आहे. अमेरिकेच्या इंडियाना भागातील शाकामाक हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी याची निर्मिती केली आहे. या गिटारचे अनावरण १७ मे १९९१ला झाले होते. त्यावेळी ६ ध्वनीवर्धक यंत्रांद्वारे शाळेच्या ६ विद्यार्थ्यांनी याचे वादन केले होते.

२) जगातली दुसरी सर्वात मोठी गिटार ४.३५ मीटर लांब आहे. तीचे वचद १४० किलोग्रॅम इतके आहे. कॅनडाच्या डॉन कोबाकिक याने ही गिटार बनवली होती.

३) सर्वसाधारण आकारातील सर्वांत महागडी गिटार जर्मन खिट्टारा बेंटेटी ही आहे. १६२४ साली जॅक स्टेडलर याने ही गिटार बनवली होती. २२ नोव्हेंबर १९८४ रोजी त्याने १०,५०० पाउंडला लंडनमध्ये ती विकली होती.

४) रॉक गिटार वादक जिमी हेनड्रिक्स याची फेंडर स्ट्रोकाक्टर गिटार त्यांचा ढोल वाजवणारा मित्र पिचेल याच्याकडून एका निनावी खरेदीदाराने २५ एप्रिल १९९० रोजी लंडनमध्ये १ लाख ९८ हजार पाउंडला खरेदी केली होती. ही सर्वांत मौल्यवान गिटार होती.

५) सर्वाधिक वेळ गिटार वाजविण्याचा विक्रम अमेरिकेच्या रॉन बुडले यांच्या नावावर आहे. रॉन यांनी २९ आणि ३० जुन १९८४ रोजी सलग २६४ तास गिटार वाजवून हा विक्रम केला होता.

६) रिक राबेन हा सर्वाधिक वेगाने गिटार वाजवणारा म्हणून ओळखला जातो. राबेन याने २७ एप्रिल १९८९ रोजी पोकोबीयन नाईट क्लबमध्ये एका मिनिटात ५४०० स्वर वाजवले होते.



कोलंबिया नदी

पॅसिफिक समुद्राला मिळणारी ही उत्तर अमेरिकेतील मोठी नदी आहे. कोलंबिया नदीची लांबी १९४२ किलोमीटर इतकी असून तिचे जलवाहनक्षेत्र ६७ हजार १०० चौरस किलोमीटर इतके आहे. कॅनडाच्क्षा ब्रिटिश कोलंबिया प्रांताच्या आग्नेय भागात, रॉकी पर्वतातील ८३३ मीटर उंचीवरील कोलंबिया सरोवरात ही नदी उगम पावते आणि तेथून वायव्येस ३०४ किलोमीटर वहात जाते. कॅनडामध्ये कोलंबिया नदी एकूण ७४४ किलोमीटर वाहते.



एकदा एक कवी एका श्रीमंत माणसला भेटण्यासाठी गेला. आपल्याला काही बक्षिस मिळेल या हेतूने त्या कवीने अनेक सुंदर कविता त्या श्रीमंत माणसाला ऐकविल्या. मात्र तो महाकंजूश माणूस होता. तो कवीला म्हणाला, तुमच्या कविता ऐकून मी खुश झालो आहे. तुम्ही उद्या परत या, मी तुम्हाला खुश करून टाकेन''

उद्या चांगले बक्षिस मिळेल असा विचार करत तो कवी घरी पोहोचला आणि झोपून गेला.

दुसऱ्या दिवशी तो कवी पुन्हा त्या श्रीमंत माणसाच्या घरी गेला. श्रीमंत माणूस म्हणाला, ''ज्याप्रकारे तुम्ही मला तुमच्या कविता ऐकवून खुश केले त्याचप्रमाणे मीही तुला बोलावून खुश आहे. तू मला काल काहीच दिले नाही त्यामुळे मीही तुला काहीच देणार नाही, हिशेब बरोबर झाला.''

श्रीमंत माणसाच्या अशा वागण्यामुळे कवी खूपच नाराज झाला. त्याने ही घटना आपल्या मित्राला सांगितली. त्या मित्राने ही घटना बिरबलाला सांगितली. बिरबल त्या मित्राला म्हणाला, ''मी जसे सांगतो तसे कर. तू त्या धनवानासोबत मैत्री करून त्याला तुझ्या घरी जेवणासाठी आमंत्रित कर. तुझ्या त्या कवी मित्रालाही बोलाव. मीही तिथे असेन.''

काही दिवसांनी बिरबलाच्या योजनेनुसार कवीच्या मित्राच्या घरी दुपारच्या जेवणाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. ठरलेल्या वेळी तो श्रीमंत माणूस हजर झाला. त्यावेळी बिरबल कवी आणि इतरांबरोबर गप्पा मारण्यात मग्न होता. वेळ निघून जात होता तरीही जेवणासाठी कोणतीही हालचाल दिसत नव्हती. श्रीमंत माणूस बेचैन झाला होता. न राहवून शेवटी तो म्हणालाच, ''जेवणाची वेळ कधीच निघून गेली आहे, आपण येथे जेवणासाठी नाही आलो आहोत का?''

''जेवण, कोणते जेवण,'' बिरबलाने विचारले.

श्रीमंत माणूस रागावून म्हणाला, ''याचा अर्थ तुम्ही मला जेवणासाठी बोलावले नाही''

बिरबल म्हणाला, ''जेवणाचे आमंत्रण नव्हतेच. तुम्हाला खुश करण्यासाठी केवळ जेवणासाठी या असे सांगण्यात आले होते.''

या प्रकारामुळे तो श्रीमंत व्यक्ती खूपच संतापला. रागातच तो म्हणाला, ''हे सर्व काय आहे, एका प्रतिष्ठित माणसाला असे अपमानित करणे तुम्हाला शोभते काय? तुम्ही मला धोका दिला आहे.''

बिरबल हसत हसत म्हणाला, ''ही गोष्ट चुकीची नाही असे मी म्हटले तर...? तुम्ही या कविला उद्या ये असेच म्हणून फसविले होते. मीही तसेच काही केले, तुमच्यासारख्या लोकांशी असेच वागले पाहिजे.

श्रीमंत माणसाला आपली चूक उमजली आणि कविला चांगले बक्षिस देऊन त्याने तिथून काढता पाय घेतला.

बिरबलाच्या चातुर्यकथा



पक्ष्यांचा न चुकणारा प्रवास

अनादी कालापासून मानव प्रवास करत आला आहे. त्याचप्रमाणे प्राणी, पक्षीही शेकडो मैलांचा प्रवास करत असतात. खराब हवामानापासून वाचण्यासाठी पक्षी स्थलांतर करून चांगल्या हवामानाच्या प्रदेशात वास्तव्यासं जात असतात. ज्यावेळी त्यांच्या मूळ ठिकाणचे हवामान चांगले होते तेव्हा ते परत हजारो मैलांचा प्रवास करून मायदेशी परततात. विशेष म्हणजे, यादरम्यान रस्ता न चुकता हा हजारो मैलांचा प्रवास ते कसे करतात याचे कोडे मानवाला आजवर उलगडलेले नाही.

पक्षी एका स्थानावरून दुसऱ्या स्थानापर्यंतचा रस्ता कसा शोधतात हा शास्त्रज्ञांच्या कुतूहलाचा विषय आहे. यासाठी अनेकांनी संशोधनही केले आहे. काही तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार पक्षांमध्ये मार्ग आणि आपले इच्छित ठिकाण शोधण्याची शक्ती जन्मजात असते. याबाबत शास्त्रज्ञांना स्टार्क प्रजातीच्या एका चिमणीवर प्रयोग केला आहे. या चिमण्यांच्या एका थव्याला पकडून दुसऱ्या ठिकाणी सोडण्यात आले. जेव्हा त्या ठिकाणचे वातावरण बदलले त्यावेळी त्या चिमण्यांनी त्या नव्या ठिकाणाहूनही चांगले हवामान असलेले नेहमीचे ठिकाण शोधून काढले. तेथील हवामान बिघडल्यानंतर शास्त्रज्ञांनी त्यांना ज्या ठिकाणाहून पकडले होते, त्या ठिकाणी त्या चिमण्या परतल्या. दुसऱ्या एका प्रयोगात संशोधकांनी पक्ष्यांना त्यांच्या मूळ ठिकाणाहून पकडून विमानातून ६५० किलोमीटरवर सोडून दिले. मात्र ते पक्षी त्या ठिकाणाहून आपल्या जागेवर परत आल्याचे पाहून संशोधक चक्रावले होते.

गेल्या अनेक वर्षांपासून पक्षी रात्रीच्या वेळी कसा प्रवास करत असतील याबाबत अनेकांना कुतुहल होते. काही अमेरिकन आणि जर्मनीच्या संशोधकांनी हे गुढ उलगडल्याचा दावा केला आहे. या संशोधकांनी अनेक पक्षी पकडून त्यांच्या शरीरात रेडीओ ट्रांसमीटर बसवून रात्रीच्या वेळी त्यांचा पाठलाग केला. या प्रयोगाचे विश्लेषण करताना, पक्षी रात्रीच्या वेळी चुंबकीय लहरींच्या मदतीने प्रवास करत असल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. मानवाकडून फक्त पक्ष्यांवर करण्यात आलेला हा पहिला प्रयोग होता. पक्ष्यांच्या या थक्क करणाऱ्या प्रवासामध्ये सर्वांत प्राधान्याने नाव घेतले जाते ते कबुतर. इतर पक्ष्यांपेक्षा कबुतरांकडे मार्ग ओळखण्याची एक अनोखी क्षमता आहे. कितीही लांबचा प्रवास असो न चुकता ते आपल्या ठिकाणी परत येतात. याबाबतच्या संशोधनानुसार कबुतर सूर्याच्या मदतीने आपला मार्ग ओळखतात. सूर्याच्या दिवसभर बदलणाऱ्या स्थितीनुसार आपली दिशा ओळखण्याची क्षमता कबुतरामध्ये असल्याने हजारो किलोमीटरचा प्रवास ते न चुकता पूर्ण करतात.

जाणून घ्या



माणसाला अन्नाची गरज का लागते?

माणसाला जगण्यासाठी हवे बरोबरच अन्न आणि पाण्याची गरज भासते. माणूस हवेतून प्राणवायू पोटात घेत असतो. आपल्या शरीराची वाढ होण्याकरिता अन्न आणि पाण्याची गरज भासत असते. अन्नामुळे शरीराच्या वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व घटकांचा पुरवठा शरीराला केला जातो. आपल्या शरीरात ताकद निर्माण करण्याचे काम अन्नाद्वारे केले जाते. शरीरातील अन्नाचे रुपांतर ऊर्जेमध्ये होत असते. अन्न खाल्ल्यानंतर शरीरात जे उष्मांक निर्माण होतात, ते आपल्या शारीरिक हालचालींमुळे खर्च केले जातात. शारीरिक हालचाल झाली नाही तर उष्मांकाचे प्रमाण वाढते आणि त्याचे रुपांतर चरबीमध्ये होते. माणसाला प्राणवायू इतकीच अन्नाची गरज असते. शरीराच्या आणि मेंदूच्या हालचालीसाठी अन्नाची गरज भासत असते. चालणे, पळणे, लिहिणे, वाचणे, पोहोणे, अशा वेगवेगळ्या क्रियांसाठी शरीराला जी ऊर्जा लागते ती पुरवण्याचे काम अन्नाद्वारे केले जाते. एकदा खाल्लेले अन्न पचल्यानंतर आपल्याला पुन्हा भूक लागते. म्हणजेच खाणे आणि अन्नाचे पचन होणे या क्रिया शरीरात सतत चालू असतात. लहान बाळाला नियमित अंतराने अन्न देण्याची गरज असते. नियमित अंतराने त्याला अन्न मिळत गेले तर त्याच्या शारीरिक आणि बौद्धिक वाढीसाठी आवश्यक असलेले घटक मिळू शकतात. सर्वसाधारणपणे माणूस दोन वेळा जेवतो, एका वेळेस नाष्टा करतो. या तीन क्रियांच्या मध्येही माणूस या ना त्या प्रकारे काही तरी खात असतो. आपण खाल्लेले अन्न जठराद्वारे पचन केले जाते. अन्नाचे बारीक बारीक तुकडे करून ते रक्तवाहिन्यांद्वारे पेशींना पुरवले जाते. अन्न पोटात गेल्यानंतर पोटातील वेगवेगळ्या ॲसिड आणि एन्झाईमची त्यावर प्रक्रिया होते. अन्नाद्वारे प्रोटिन्स, कार्बोहायड्रेटस, मिनरल्स असे शरीराच्या वाढीसाठी आवश्यक असणारे वेगवेगळे घटक शरीराला पुरवले जातात.

शरीराला आवश्यक असणारी प्रोटिन्स हे मांस-मटण, मासे, अंडी, दुग्धजन्य पदार्थ यामध्ये उपलब्ध असतात. ब्रेड, तांदूळ, पास्ता, बटाट, साखर, चॉकलेट यामध्ये कार्बोहायड्रेट असतात. बटर, तेल, क्रिम यामध्ये चरबीयुक्त पदार्थ असतात. फळे आणि भाजीपाल्यातून शरीराला व्हिटॅमिनचा पुरवठा होतो. अन्नातून शरीराला जी ऊर्जा मिळत असते, ती उष्मांकामध्ये (कॅलरी) मध्ये मोजली जाते. वयाच्या पंचवीशी-तीशीनंतर माणसाला दररोज २५०० उष्मांकाची गरज भासत असते. माणसाला दररोज दोन लिटर पाण्याची किमान गरज भासत असते.



माहीत आहे का?

शोध ट्रॅफिक सिग्नलचा

शोधाची दुनिया

ऑटोमोबाईल वाहनांचा शोध लागण्याआधी माणसाचा प्रवास बैलगाडी, घोडा, पालखी वगैरेतून होत असे. त्यामुळे रस्त्यावरील अपघातांचे प्रमाणही तेव्हा खूप कमी असे. नंतर चार चाकी गाड्यांचा शोध लागला. कार उत्पादन करणारा पहिला कारखाना हेन्री फोर्ड यांनी अमेरिकेत १९०३मध्ये काढला. कार अमेरिकेत लोकप्रिय झाल्यावरही घोडागाडी, सायकल वगैरे वाहने रस्त्यावर धावत होतीच. रस्त्यावर आधुनिक आणि प्राचीन वाहनांच्या गर्दीत साहजिकच अपघातांचे प्रमाणही वाढले.

आफ्रिकन अमेरिकन शास्त्रज्ञ गॅरेट मॉर्गन यांनीही असाच एक अपघात पाहिला. एक घोडागाडी आणि मोटर कार यांची टक्कर झाल्याचे मॉर्गन यांनी पाहिले आणि त्यांना वाहतुकीचे नियमन करण्यासाठी सिग्नल असायला हवी असे वाटू लागले. त्यातूनच पहिल्या ट्रॅफीक सिग्नलचे डिझाईन तयार झाले आणि त्यांनी तो तयारही केला. या सिग्नलमध्ये तीन भुजा असलेला टी आकाराचा खांब असे, त्यावर 'स्टॉप' आणि 'गो' असे सिग्नल्स हँडलने जोडलेले होते. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी किंवा अपघात टाळण्यासाठी एका किंवा अनेक दिशांची वाहतूक थांबवण्यासाठी हा सिग्नल एकाआड एक (म्हणजे एकदा गो आणि एकदा स्टॉप अशा तऱ्हेने)



वापरता येत होता. मॉर्गनना या शोधाचे पेटंट १९२३मध्ये मिळाले. त्यानंतर त्यांनी त्याचे अधिकार लगेच जनरल इलेक्ट्रीक कंपनीला चाळीस हजार डॉलरना विकले.

गॅरेट मॉर्गन यांचे वडील गुलाम होते. मॉर्गन यांचे रूढार्थाने शिक्षण झाले नव्हते. पण त्यांच्यातील कुतूहल आणि प्रयोग करण्याची वृत्ती यामुळे एक शास्त्रज्ञ म्हणून ते नावारूपाला आले. ट्रॅफीक सिग्नलबरोबरच त्यांनी गॅस मास्क, शिलाई मशीनला जोडता येणारी झिगझॅग ॲटॅचमेंट, कंगवा असे इतरही अनेक शोध त्यांनी लावले.



वनराज सिंह

बालमित्रांनो, डौलदार चालीचा, गळ्याभोवती आयाळ असणारा सिंह तुम्ही पाहिला असेल ना? जंगलचा राजा म्हणून तो ओळखला जातो. मांजर जातीमधील आकाराने दुसऱ्या क्रमांकाचा मोठा प्राणी म्हणजे सिंह होय. नर सिंहाचे सरासरी वजन हे साधारण १८० किलोग्रॅम तर मादीचे सरासरी वजन १३० किलोग्रॅम इतके असते. आतापर्यंत सर्वांत जास्त वजनाचा सिंह ३७५ किलोग्रॅम इतका वजनदार असल्याचे नोंदवलेले आहे.

सिंह ८१ किलोमीटर प्रतितास या वेगाने धावू शकतात पण ते जास्त वेळ धावू शकत नाहीत. कारण तेवढी ऊर्जा त्यांच्यात नसते. सिंहाची गर्जना आठ किलोमीटर अंतरावरून ऐकू येते. आफ्रिकेच्या दक्षिण आणि पूर्व भागातील जंगलांमध्ये बहुतेक सिंह आढळतात.

इतर मार्जार कुळातील प्राण्यांच्या तुलनेत सिंह हे जास्त सामाजिक असतात. ते नेहमी आपल्या जोडीदारासोबत, छाव्यांसोबत आणि काही मोठ्या सिंहांबरोबर एकत्र राहतात. आयाळ असल्यामुळे नर सिंह चटकन ओळखू येतो. सिंह हा अल्बानियन, बेल्जियम, बल्गेरियन, इंग्लंड, इथोपिया, नेदरलँड आणि सिंगापूर, लक्झेंबर्ग या देशांचा राष्ट्रीय प्राणी आहे. सिंहांचे सरासरी आयुष्यमान १२ वर्षांचे असते. मादी सिंह ही नर सिंहापेक्षा अधिक चांगली शिकारी असते. दिवसातले वीस तास जंगलात राहणारे सिंह आराम करत असतात. वाघाच्या संकराबरोबरच सिंहाचे इतरही संकर असतात. चित्ता आणि सिंह यांच्या संकराला लिओपॉन्स असे म्हणतात, तर बिबट्याबरोबरच्या संकराला जॅग्लिऑन्स असे म्हणतात.

दुनिया प्राण्यांची

'सफर' ग्लायडरची

छोट्या आकाराचे ग्लायडर हे विमान आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे ओळखले जाते. या विमानाचे वजन अत्यंत कमी असते. हे विमान स्वतःच्या ताकदीवर हवेत उडू शकत नाही. हवेत उड्डाण करण्याकरिता या विमानाला बाह्य ऊर्जेची गरज भासते. अन्य विमानाद्वारे ग्लायडरला हवेत उड्डाण घेण्यासाठीची ऊर्जा पुरवली जाते. हवेतील दाबांच्या पट्ट्यांच्या आधारावर हे विमान हवेत तरंगते. वैमानिकाला हवेच्या दाबांच्या पट्ट्याचा वापर कसा करून घ्यायचा हे ठाऊक असणे आवश्यक असते. हवेतील कमी आणि जास्त दाबांच्या पट्ट्यांचा वापर करून वैमानिक ग्लायडर विमान दीर्घकाळ हवेत ठेवू शकतो.

मोठ्या आकाराच्या पतंगाप्रमाणे हँग ग्लायडर असते. अलीकडच्या काळात हँग ग्लायडींग हा खेळाचा साहसी प्रकार म्हणून ओळखला जातो. हँग ग्लायडरच्या त्रिकोणी आकाराच्या सांगाड्यातील बारचा वापर करून हँग ग्लायडरचा वेग आणि दिशा निश्चित केली जाते. नवख्या माणसाला हँग ग्लायडरद्वारे पंधरा फूट उंचीपर्यंत बराच काळ उडता येऊ शकते. यातील अनुभवी मंडळी याही पेक्षा अधिक उंचीवर बराच काळ राहू शकतात. वाऱ्याची दिशा अचानक बदलली तर हँग ग्लायडरला तातडीने आपली दिशा बदलावी लागते. तसे केले नाही तर दुर्घटना घडण्याची शक्यता असते. हँग ग्लायडींगचा प्रकार अधिक सुरक्षित बनवण्याकरिता वेगवेगळे उपाय योजण्यात आले आहेत. ज्यांना साहसी, थरारक खेळाचा आनंद लुटण्याची इच्छा असते, अशांनी हँग ग्लायडिंगचा अनुभव जरूर घ्यावा.



दोस्ती इंग्रजीशी

remove : अर्थ : दूर करणे, काढून टाकणे
Remove your shoes.
: अर्थ : बूट काढा.
Nice : : अर्थ : छान, सुरेख
She had a nice doll.
: अर्थ :तिच्याकडे एक सुरेख बाहुली होती.

हसा पोट धरून

गण्या आणि मन्या या दोघांनी सोडवलेल्या प्रश्नांची उत्तरं एकसारखीच असल्याचं पाहून शिक्षकांनी वर्गात आल्याबरोबर दोघांनाही समोर बोलावलं आणि सांगितलं, ' या दोघांच्याही उत्तरपत्रिकांमधील उत्तरं एकसारखीच आहेत. या दोघांचे नंबरही परीक्षेच्या वेळी पुढे मागे होते. त्यामुळे यांनी कॉपी केली आहे, हे निश्चित. गण्या तुला काही बोलायचं आहे का यावर?'

गण्या म्हणाला, 'अहो गुरुजी, आमच्या उत्तरपत्रिकांचं काय सांगताय, आमच्याच नव्हे तर सगळ्या वर्गाच्या प्रश्नपत्रिकाच जशाच्या तशा होत्या. त्याचं काय?

म्हणींचे अर्थ

मनी वसे ते स्वप्नी दिसे

मनात जसे विचार असतील तशाच आशयाची स्वप्ने माणसाला पडतात. त्यामुळेच मनात नेहमी सकारात्मक विचारच ठेवावेत, असं सांगितलं जातं.

शब्दकोडे

१	२	■	३	
४		५		■
६		■	■	७
■	८	९		
१०	■		■	

आडवे शब्द : १) घरगुती वापराचे एक धारदार साधन ३) विडा रंगण्यासाठी वापरला जाणारा पदार्थ ४) उमेदवारांना मत देण्याची प्रक्रिया ५) दुसऱ्याला देणे ६) शीर, रक्तवाहिनी ८) ट्रॅफिक १०) १२ महिन्यांमधील शेवटून सातवा महिना

उभे शब्द : १) कुसुम २) पद्धतशीर, परंपरेनुसार ३) कर्ण ७) रामायणामध्ये हरिणाचे रूप धारण करणाऱ्या राक्षसाचे नाव ९) हत्ती